‘गायक सी.रामचंद्र’

---------------------------------

रामचंद्र नरहर चितळकर, म्हणजेच सी.रामचंद्र उर्फ ‘अण्णा’ हयांचा जन्म बारा जानेवारी १९१८ सालचा.तर हयाच महिन्यातल्या पाच तारखेला १९८२ साली ते अवघ्या ६४ व्या वर्षी गेले.१९४२ च्या ‘सुखी जीवन’ पासून १९७२ च्या ‘तुलसी विवाह’ पर्यंत सुमारे शंभराहून अधिक बोलपटांतून त्यांनी आठेकशे गाणी दिली.संगीतकार म्हणून त्यांची कारकीर्द खूप गाजली.त्यातही १९५0 ते १९६३ हा कालखंड त्यांच्या अवीट गोडीच्या गाण्यांनी गाजला.पार्श्वगायक या नात्यानं त्यांनी गायिलेली बोलपटांतली गाणी पण खूप गाजली.१९६५ नंतर मात्र त्यांनी सुगम संगीताच्या क्षेत्रात गायक व संगीतकार म्हणून बरंच काम केलं.त्यात बरीच गाणी त्यांनी स्वतः गायिली आहेत.या क्षेत्रातलं त्यांचं काम काहीसं विसरलं जाऊ लागलं आहे.त्याला उजाळा मिळावा म्हणून मंगळवार दिनांक १८ जानेवारी रोजी सायंकाळी दक्षिण मुंबईतल्या ‘यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान’ येथे ‘गायक सी.रामचंद्र’ हया विषयावरील एका दृक-श्राव्य कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.त्यानिमित्तानं त्यांच्या विशेष ध्वनिमुद्रिकांचा हा आढावा.

अण्णा साईबाबांचे परम भक्त होते.त्यांच्या घराचं नावच मुळी ‘साई प्रसाद’ असं होतं.१९६८ साली एच.एम.व्ही.साठी ‘साईबाबांचा पोवाडा’ त्यांनी मुद्रित केला.७८ गतीच्या ध्वनिमुद्रिकेत तो दोन भागांत वितरित झाला.राम गुलाम हयांनी लिहिलेलं हे मराठी ‘साई चरित्र’ अवघ्या सहा मिनिटांचं असून अण्णांनी ते अतिशय समरसून

गायलेलं आहे. एच. एम. व्ही. च्या लाल लेबलवरती 'अण्णासाहेब चितळकर आणि पार्टी' (सी. रामचंद्र) असं लिहिलं आहे.

मात्र अण्णांच्या आवाजातली पहिली ७८ गतीची ध्वनिमुद्रिका १९३८ / १९३९ साली रेनबो रेकॉर्ड वर निघाली. त्यावेळी काही संगीतकारांनी एकत्र येऊन रेनबो ही कंपनी स्थापन केली होती. त्यात त्यावेळचे उदयोन्मुख संगीतकार श्री. नौशाद अली हयांचा पुढाकार होता. बोलपट संगीताच्या आक्रमणात सुगम संगीतही टिकून रहावं हा हेतू होता. हीच मंडळी गाणी लिहवून घेत, चाली लावत व रेकॉर्डस बाजारात आणत. हया लेबलवर 'मास्टर राम चितळकर' हया नावानं एक ध्वनिमुद्रिका आढळते. 'शामा घेऊनि मुरलि' व 'प्रभुवर नटविसि (भैरवी)' ही दोन पदं के. आर. पुरोहित हयांनी लिहिलेली असून संगीत एस. नेवरेकर हयांचं आहे. वीसेक ध्वनिमुद्रिका काढून हया कंपनीचा कारभार आटोपला. हया दोन गाण्यांत अण्णांचा ऐन वीशितला कोवळा असा भावगीत गायकाचा आवाज ऐकायला मिळतो. तो आज इतक्या वर्षांनी ऐकताना नवल वाटतं.

ग्रामोफोन कंपनीच्या 'क्यू. सी.' सीरीज मध्ये 'ध्यानी धर रे मुला' हे एक प्रचार गीत सी. रामचंद्र हयांनी स्वतः गायलं असून त्याचं संगीत त्यांचंच आहे. हे पांढ-या रंगाचं लेबल असून ग्रामोफोन कंपनीनं 'महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी', दादर, मुंबई हयांच्या साठी खास बनविलेलं आहे. हे निवडणूक प्रचाराचं गीत असून मतदारांना आवाहन करणारे शब्द असे आहेत - 'ध्यानी धर रं मुला, ध्यानी धर ग मुली, बैलजोडीच्या चित्राम्होरं करा मताची फुली'. हे असलं प्रचार

काव्य कुणी रचलंय हयाचा उल्लेख लेबलवर नाही.मात्र ग.दि.माडगूळकरांनी लिहिलं असण्याची दाट शक्यता आहे.कारण हया काळात सी.रामचंद्र व वसंत देसाई हयांच्याप्रमाणेच ते सुद्धा अनेक सरकारी उपक्रमांत सहभागी झालेले होते.या गीतात काँग्रेसच्या 'बैलजोडी' हया निवडणूक चिन्हाच्या चित्राचा उल्लेख आहे.त्यावरून हे प्रचारगीत १९६0 च्या दशकातलं नेहरूंच्या काळातल्या निवडणूकांचं असावं असं वाटतं.

ग.दि.माडगूळकरांनी 'गीत रामायण' लिहिलं व बाबूजी सुधीर फडके हयांनी गाऊन ती 'राम' कथा घरोघरी पोहोचवली.त्याच्या अभूतपूर्व यशानंतर ग.दि.माडगूळकरांनी पस्तीस गाण्यांची 'गीत गोपाल' ही कृष्णकथा रचली.त्याला चाली लावून अण्णांनी 'गीत गोपाल' हयाच नावानं  अनेक कार्यक्रमही केले.रौप्य महोत्सवाला प्रभातच्या 'गोपाल क्रिष्ण' बोलपटाच्या संगीतकार मास्टर कृष्णरावांना बोलावलं होतं.पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात हा सोहोळा झाला. पुढे १९७२ मध्ये ग्रामोफोन कंपनीनं 'गीत गोपाल' च्या दोन एल.पी.रेकॉर्डस वितरित केल्या व त्यात एकूण १७ गाणी मुद्रित झाली.त्यातली सहा गाणी त्यांनी गायिली आहेत.प्रमिला दातार, फैय्याज, राणी वर्मा, बकुळ पंडित, निळकंठ अभ्यंकर हयांनी इतर गाणी गायली आहेत.हया ध्वनिमुद्रिकेच्या वेष्टनावरील मजकूर मजेशीर आहे : "सी.रामचंद्र या नांवामुळे काही मराठी माणसे समजतात की, हा संगीतकार दाक्षिणात्य असावा.सी.रामचंद्र हे रामचंद्रराव चितळकर आहेत.वाणीने व विचारानेही ते अस्सल मराठी आहेत.ते काव्यरसज्ञ आहेत.संगीतासाठी शब्द दुखविण्याची चूक ते चुकूनही करीत

नाहीत”.याशिवाय ‘हया ध्वनिमुद्रिकेची संग्राहयता गीतरामायणाच्या ध्वनिमुद्रिकांइतकीच अपरिहार्य आहे’ असं वेष्टनावर लिहिलं आहे.मात्र रसिकांनी ते फारसं मनावर घेतलेलं दिसत नाही.आज ही ध्वनिमुद्रिका अतिशय दुर्मिळ असून गाणी मात्र सी.डी.वर पुन्हा वितरित झाली आहेत.

एच.एम.व्ही.च्या श्री.वसंतराव कामेरकर हयांनी १९६८ साली, मराठी भक्ती गीतांच्या ‘श्री साई दरबार’ हया एल.पी.रेकॉर्डची निर्मिती केली.त्याचं संगीत सी.रामचंद्र हयांनी दिलं व निवेदन आकाशवाणीच्या प्रसिद्ध निवेदिका कमलिनी विजयकर हयांनी केलं.त्यात अण्णांनी दोन गाणी गायिली आहेत.इतर गायक गायिकांत महंमद रफी, मुकेश, मन्ना डे, महेंद्र कपूर, माणिक वर्मा, व्ही.जी.भाटकर, रामदास कामत, निळकंठ अभ्यंकर असून गीतरचना राम गुलाम व भरत व्यास यांची आहे.वेष्टनावर श्री.संत साईबाबांच्या पूर्णाकृती मूर्तीचं रंगीत छायाचित्र आहे.साई भक्तांमध्ये ही ध्वनिमुद्रिका आवर्जून ऐकली जात असे.

त्याच सुमारास ‘इनरिको’ नावाच्या कंपनीनं अण्णांच्या आवाजात मराठी भक्ती गीतांची एक ई.पी.रेकॉर्ड बनविली.त्यात तुकोबा व नामदेवांचे अभंग असून वेष्टनावर पांडुरंगाच्या मूर्तीचं सुंदर छायाचित्र छापलेलं आहे.त्यांचं संगीत केशव बडगे व सी.रामचंद्र हयांचं आहे.१९७९ सालातली ही ध्वनिमुद्रिका आज दुर्मिळ आहे.त्या अगोदर १९७७ साली हयाच कंपनीनं अण्णांच्या आवाजात ‘शब्द संगीत’ हया शीर्षकाची एक ई.पी.वितरित केली.तिच्या वेष्टनावर

पियानोवरील मांजराचा कान पकडून अण्णा गाणं सांगत असल्याचं अतिशय मजेदार छायाचित्र आहे. त्यात दोन कविता कुसुमाग्रजांच्या असून ('नवलाख तळपती दीप' व 'दूर देशी राहिलेले दीन') तर दोन कविता ('पहाटे पहाटे मला जाग आली' व 'मागता न आले म्हणूनी') सुरेश भटांच्या आहेत. एका गीताचं संगीत ('मागता न आले म्हणूनी') इ. डॅनियल हयांचं आहे.


१९७२ साली त्यांनी कवी शांताराम नांदगावकर हयांची चार बालगीतं मुद्रित केली. 'कोल्हयाची फजिती', 'दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ', 'सिंह आणि ऊंदीर', 'बेडूक आणि बैल' ही गाणी पूर्वी रेडियोवर खूपदा ऐकवली जायची. १९७४ मध्ये चार हिंदी भजनांची एक ई. पी. आली. सरस्वती कुमार दीपक हयाच्या रचना असून संगीत व आवाज अण्णांचा आहे. 'तू कहाँ गया मेरे किशन सावरे' 'कैसे हो तुम किशन कन्हाई' 'मोहन का क्या ठिकाना' 'ना मैं रूप देखता' ही गाणी विविध भारतीवरून अनेकदा ऐकायला मिळायची. पण सर्वात अधिक मराठी गाणी ऐकायला मिळायची ती अण्णा जोशींची. अगदी अलिकडे २००९ साली सारेगामा कंपनीनं (म्हणजे पूर्वीच्या एच. एम. व्ही. नं) 'अनमोल गाणी' हया एका सी. डी. वर अण्णांची एकल व युगुल अशी बावीस गाणी पुन्हा वितरित केली आहेत. त्यात मंगेश पाडगावकर व वसंत निनावे हयांची गीतं आहेत. काही मराठी बोलपटातली गाजलेली गाणी आहेत. हया सी. डी. च्या वेष्टनावर सी. रामचंद्र हयांचा अगदी तरूणपणातला राजबिंडा फोटो छापलेला आहे. काही गाजलेल्या गाण्यांच्या ओळी आहेत. त्या वाचताच मनात ती गाणी आपोआप


वाजायलाच लागतात - 'प्रभू तुझ्या दारी आलो होऊनी भिकारी' 'पळभर थांब जरा रे विठू' 'पाहिला भाकरीत भगवान' 'मजेदार झोपडी' 'पाचोळे आम्ही पाचोळे' 'यशाला घालिती माळा' व 'हाय काय जगात राम'.

सी. रामचंद्र यांचा आवाज मुळातच अतिशय गोड. आयुष्याच्या अखेरच्या पर्वात तर तो अधिकच परिपक्व व पुन्हा पुन्हा ऐकावासा वाटतो. सुदैवानं मुद्रणांच्या रूपात तो उपलब्ध आहे. हया लेखात काही ध्वनिमुद्रित गाण्यांचा ऊल्लेख राहून गेला असण्याची दाट शक्यता आहे. अधिक माहितीचं स्वागतच आहे.

डॉ. सुरेश चांदवणकर
नेव्हीनगर, कुलाबा, मुंबई
८ जानेवारी २०११
chandvankar.suresh@gmail.com




अनमोल गाणी
sa re ga ma
सी. रामचंद्र
प्रभु तुझ्या दारी आलो
पळभर थांब जरा रे विठू
यशाला घालिती माळा
पाहिला भाकरीत भगवान
देवानं आम्हासाठी काय साधल
मजेदार झोपडी
जाहले आश्रम सारे रिते
सदाबहार अनमोल मराठी गाण्यांचा आविष्कार


INRECO
C. RAMCHANDRA MARATHI GEETE
शब्द-संगीत
सी. रामचंद्र